# सहसंचालक,, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर

दुरध्वनी क्र. 0712-2557266/46 कार्यासन दु. क्र. 0712-2557266

E-mail : ronagpur@dtemaharashtra.gov.in Website: rdtenagpur.org.in


**परिपत्रक**

क्र.तशिस/विकाना/शैवि-1/ARA/2019/ 3312

दिनांक:- 4 NOV 2019

प्रति,

प्राचार्य/संचालक,
सर्व अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र/वास्तुशास्त्र/एच.एच.सी.टी/एमबीए/एसीए,
पदवी व पदव्युत्तर पदवी संस्था, नागपूर विभाग, नागपूर.

विषय:- प्रवेश नियामक प्राधिकरणाकडे मान्यतेकरीता सादर करावयाच्या प्रस्तावाबाबत.
संदर्भ:- प्रवेश नियामक प्राधिकरण, म.रा., मुंबई यांचे परिपत्रक क्र. प्रनिप्रा/प्र.क्र.248/बैठक विषय/प्राधिकारण/966, दि. 22/10/2019

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनिकरण) अधिनियम, 2015 पुर्वी असलेले प्रवेश नियंत्रण समिती यांचेकडे आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे प्रवेश अंतीम मान्यतेकरीता अद्यापपर्यंत प्रलंबित आहेत काय? तसेच शैक्षणिक वर्ष 2016-17 ते 2018-19 मध्ये आपल्या महाविद्यालयातील ज्या विद्यार्थ्यांचे प्रवेश अंतीम मान्यतेकरीता प्रलंबित आहेत या आशयाची माहिती संदर्भिय पत्रातील मुद्दा क्र. १, २ व 3 नुसार आपण याआगोदर प्रस्ताव सादर केले असले तरी परत फेर प्रस्ताव व माहिती या कार्यालयाकडे **<u>बुधवार, दि. 6/11/2019 रोजी दुपारी 12.00 वाजेपर्यंत सादर करावे</u>**, प्रस्ताव उशिराने प्राप्त झाल्यास त्याबाबत विचार केला जाणार नाही याबाबत नोंद घ्यावी.

**सहपत्र:**- संदर्भिय पत्र

**(डॉ. राम निबुदे)**
**प्र. सहसंचालक**
**तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, नागपूर.**

C:\Meshram Degree\Letters\Letter to All Institute.doc

महाराष्ट्र शासन

# प्रवेश नियामक प्राधिकरण

९वा मजला, न्यु. एक्सलसियर
बिल्डींग, ए.के. नायक मार्ग,
फोर्ट, मुंबई - ४०० ००१

दूरध्वनी : ०२२ - २२०१ ६१५९
वेबसाईट : http://www.maha-ara.org
ईमेल : maharashtra.ara@gmail.com

महत्वाचे / कालमर्यादा / ईमेलद्वारे

क्रमांक: प्रनिप्रा/प्र.क्र.२१८/बैठक-विषय/प्राधिकरण/९६६

दिनांक : 22 OCT 2019

## परिपत्रक

विषय : प्राधिकरणाच्या मान्यतेकरिता सादर करावयाच्या प्रस्तावांबाबत....

संदर्भ : १. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांची दिनांक २२/०८/२०१९ रोजीची अधिसूचना.

२. महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ मधील तरतूदी.

३. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक ७/०८/२०१९ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्र. ७(ए) मधील निर्देश.

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ मध्ये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करण्यासाठी व त्यास नेमून दिलेली कार्ये पार पाडण्यासाठी संदर्भ क्र. १ येथील उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या दिनांक २२/०८/२०१९ रोजीच्या अधिसूचनेद्वारे प्रवेश नियामक प्राधिकरण गठित करण्यात आलेले आहे.

अधिनियम २०१५ मधील तरतूदींनुसार प्राधिकरणास सादर करावयाच्या प्रकरणा संदर्भात प्राप्त झालेल्या निर्देशास अनुसरुन सर्व संबंधीतांना खालील प्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत,-

१. महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ अस्तित्वात येण्यापूर्वी प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेबाबत जी प्रकरणे अद्याप महाविद्यालय/संस्था तसेच संचालनालय स्तरावर प्रलंबित असतील, अशा प्रकरणांबाबत अधिनियम, २०१५ पूर्वीची विहित कार्यपध्दती विचारात घ्यावी, त्या संदर्भातील प्रवेश मान्यता देण्याबाबत काय तरतूदी होत्या, तसेच तत्कालीन प्रवेश नियंत्रण समितीने सदरील प्रस्तावा संदर्भात घेतलेले निर्णय यांचे अवलोकन करुन, असे फेरप्रस्ताव संबंधीत संस्था / महाविद्यालय संचालकास सादर करावे.

संचालकांनी असे प्रस्ताव आपली शिफारस / प्रमाणपत्रासह आवश्यक सर्व माहिती (नियम / अधिनियम / शासन निर्णय / न्यायालयीन आदेश यांचा संदर्भ देऊन) मुद्देनिहाय विवेचनासह प्राधिकरणाच्या निर्णयाकरिता एक विशेष बाब म्हणुन सादर करावे.

२. शैक्षणिक वर्ष २०१६-१७ ते २०१८-१९ (अधिनियम, २०१५ अमलात आल्यापासून) या शैक्षणिक वर्षातील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेबाबतच्या प्रलंबित प्रस्तावांवर अधिनियमातील नियम, ९(५) खालील तरतूदींप्रमाणे कार्यवाही होणे अभिप्रेत होते. त्यामुळे सदर प्रस्ताव विहित कालावधीमध्ये अनुक्रमे

D:\Jayant\AuthorityProposals_ActProv.docx

३१/०१/२०१७ व ३१/०१/२०१८ प्राधिकरणास सादर झालेले आहेत का ? नसल्यास विलंबाने सादर झाले असल्यास त्याबाबत प्राधिकरणाने काय निर्णय घेतला, याबाबतच्या तपशीलासह फेरप्रस्ताव संस्था / महाविद्यालयांनी प्राधिकरणाच्या मान्यतेकरिता संबंधीत संचालक यांच्या शिफारस / प्रमाणपत्रासह नव्याने प्राधिकरणास सादर करावे आणि संचालकांनी प्रस्तावांची पडताळणी करुन आवश्यक सर्व माहितीसह (नियम / अधिनियम / शासन निर्णय / न्यायालयीन आदेश यांचा संदर्भ देऊन) मुद्देनिहाय विवेचनासह व स्वयंस्पष्ट अभिप्राय देऊन प्राधिकरणाच्या निर्णयाकरिता एक विशेष बाब म्हणुन सादर करावे.

३. सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षाचे प्रस्ताव देखील अधिनियमाच्या नियम ९(५) अन्वये प्राधिकरणास सादर होणे आवश्यक होते, त्यामुळे अशी प्रकरणे दिनांक ३१/०१/२०१९ रोजी पर्यंत प्राधिकरणापुढे आली होती का असल्यास, त्याबाबत प्राधिकरणाने काय निर्णय घेतला याच्या तपशीलासह त्रुटी पूर्ततेचा प्रस्ताव प्राधिकरणाच्या मान्यतेसाठी सादर करावा.

तथापि, सन २०१८-१९ या वर्षाचे प्रस्ताव दिनांक ३१/०१/२०१९ पर्यंत प्राधिकरणाकडे आले नसल्यास संबंधीत संचालकांच्या शिफारशीसह असे प्रस्ताव संस्था / महाविद्यालयांनी स्पष्टीकरणासह सादर करावे.

४. तसेच अधिनियम २०१५ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांच्याशी संबंधीत ज्या प्रकरणांवर भविष्यात प्राधिकरणाच्या मान्यतेची आवश्यकता असल्यास, अशी प्रकरणे देखील आवश्यक सर्व माहिती / नियम / अधिनियम / शासन निर्णय / न्यायालयीन आदेश यांचा संदर्भ देऊन मुद्देनिहाय विवेचनासह प्राप्त झाली, तरच सदरील प्रस्ताव प्रवेश नियामक प्राधिकरणाद्वारे ग्राह्य धरण्यात येतील, अन्यथा अपूर्ण प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाही व तदनुषंगाने कोणतीही सूचना/निर्देश निर्गमित होणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

वरील मुद्दा क्र. १, २ व ३ प्रमाणे प्रलंबित प्रकरणे दिनांक १५/११/२०१९ रोजी पर्यंतच्या कालावधीमध्ये प्राधिकरणास प्राप्त न झाल्यास तद्नंतर असे कोणतेही प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते संदर्भातील प्रस्ताव प्रवेश नियामक प्राधिकरणाकडून कार्यवाहीकरिता ग्राह्य धरण्यात येणार नाही व तदनुषंगाने विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेच्या अनुषंगाने भविष्यात कोणतेही न्यायालयीन प्रकरण घडल्यास, त्यास सर्वस्वी संबंधीत महाविद्यालय / संस्था / संचालक जबाबदार राहील, याची सर्वांनी गांभीर्याने नोंद घ्यावी, असे आपणास कळविण्याचे मला निर्देश आहेत.

मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य यांच्या आदेशावरुन.

(आ.ए. रायते) भा.प्र.से.
सचिव,
प्रवेश नियामक प्राधिकरण तथा
आयुक्त व सक्षम प्राधिकारी,
राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई.

प्रति,
१. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई.
२. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई.
३. संचालक, आयुष संचालनालय, मुंबई.
४. संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे
५. संचालक, कला शिक्षण संचालनालय, मुंबई.
६. संचालक/सदस्य सचिव, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन, पुणे

D:\Jayant\AuthorityProposals_ActProv..docx